# <u>जाहिर प्रगटन (e-tender) व (e-auction)</u>

## जिल्हाधिकारी कार्यालय,बीड

क्रमांक 2017/गौख/वा.लि.17-18/कावि-सीआर **दिनांक** 28.03.2018

---

**बीड जिल्हा जिल्हास्तरीय वाळूघाट लिलाव सन 2017-2018 करीता वाळू लिलावाचे ई-टेंडर / ई- ऑक्शन निविदेच्या प्रसिध्दीसाठी अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.**

सर्व जनतेस याव्दारे कळविण्यात येते की,शासन निर्णय क्रमांक: गौखनि/10/0615/प्र.क्र.289/ख दिनांक 03 जानेवारी 2018 मधील तरतूदीनुसार आणि मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी मंजूरी दिल्यानुसार सन 2017-2018 या वर्षाकरिता बीड जिल्हयातील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा बीड यांनी प्रमाणित केलेल्या तसेच ग्रामसभेचे नाहरकत ठराव प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या DEAC व DEIAA समीतीच्या च्या अटी व शर्तीला आधीन राहून बीड जिल्हायातील 14 जिल्हास्तरीय वाळूघाटांचे **<u>ई-टेंडर (e-tendar) / ई- ऑक्शन (e-auction)</u>** पध्दतीने लिलाव करण्यात येत आहेत.

**बीड जिल्हयातील सन २०१७-१८ मधील जिल्हास्तरीय (१४) वाळूघाटांचा तपशील**

| अ.क्र. | तालुका | वाळूघाटांचे नांव | नदीचे नांव | गट नं./स.नं. | उपलब्ध साठा | मा.विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांनी निश्चित केलेली अपसेट प्राईज | अनामत रक्कम 25% |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बीड | आडगाव | सिंदफणा | 120 ते 123 | 353 | 1085475 | 271369 |
| 2 | बीड | रंजेगाव-1 | सिंदफणा | 217,218 | 186 | 571950 | 142988 |
| 3 | बीड | रंजेगाव-2 | सिंदफणा | 217 | 64 | 196800 | 49200 |
| 4 | बीड | नाथापूर | सिंदफणा | 264, 47 | 155 | 476625 | 119156 |
| 5 | बीड | रामगाव-1 | सिंदफणा | 99 ते 109 | 177 | 544275 | 136069 |
| 6 | बीड | रामगाव-2 | सिंदफणा | 17 | 177 | 544275 | 136069 |
| 7 | बीड | खुंडरस | सिंदफणा | 1 ते 4, 6,7 | 265 | 814875 | 203719 |
| 8 | बीड | बहादरपूर | सिंदफणा | 12, 170, 171 | 442 | 1359150 | 339788 |
| 9 | बीड | तांदळवाडी | सिंदफणा | 2 ते 6 | 80 | 246000 | 61500 |
| 10 | माजलगाव | सांडचिचोली | सिंदफणा | 5,7,8,11,222,223 | 1431 | 4400325 | 1100081 |
| 11 | अंबेजोगाई | तटबोरगाव | मांजरा | 35,38, 40 आ, 37 | 721 | 2217075 | 554269 |
| 12 | माजलगाव | डूब्बाथडी | गोदावरी | 6,7,8 | 5088 | 5876640 | 1469160 |
| 13 | माजलगाव | छत्रबोरगाव | गोदावरी | 158,160,166/1,166/2,186,192 | 6714 | 7264548 | 1816137 |
| 14 | माजलगाव | आडोळा | गोदावरी | 1,3,4,79 | 1272 | 1558200 | 389550 |

वरील दर्विलेल्या वाळूघाटांचा लिलाव कालावधी हा शासन निर्णय क्रं.गौखनि/10/0615/प्र.क्रं.289/ख/ मधील 9(अ) मध्ये दर्विलेल्या प्रमाणे लिलाव घेण्याची तारीख काही असली तरी लिलावाचा कालावधी वर्षाच्या 30 सप्टेंबर रोजी संपुष्टात येईल.मात्र,

(अ) 3000 ब्रास पर्यंतच्या परिमाणाच्या वाळूघाटांचे लिलाव तीन महिने किंवा 30 सप्टेंबर या पैकी जो कमी असले तेवढया कालावधी करीता रहिल.

**(ब)** 3000 ते 4500 ब्रास पर्यंतच्या परिमाणाच्या वाळूघाटाचा लिलाव, 4 ½ महिने किंवा 30 सप्टेंबर या पैकी जो कमी असेल तेवढया साठी करण्यात येईल.

**(क)** 4501 ते 6000 ब्रास पर्यंतच्या परिमाणाच्या वाळूघाटाचा लिलाव, 6 महिने किंवा 30 सप्टेंबर या पैकी जो कमी असेल तेवढया साठी करण्यात येईल.

**(ड)** 6001 ते त्यावरील परिमाणाच्या वाळूघाटांचे लिलाव 30 सप्टेंबर पर्यंतच्या कालावधी करण्यात येतील.

इच्छुकांनी खालील वेळापत्रकाप्रमाणे ई-निविदा **www.mahatenders.gov.in** व **eauction.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भराव्यात. ई-निविदा प्रथम फेरीसाठी दि.03.04.2018, द्वितीय फेरीसाठी दि.16.04.2018 आणि तृतीय फेरी दि.02.05.2018 रोजी होईल. ज्या वाळूघाटांचे ई-निवीदा प्रथम फेरीत प्राप्त न झाल्यास त्याचे फेर ई-निविदा पुढील फेरीसाठी वेळाप्रमाणे राहील.ज्या व्यक्ती,संस्था, इ.यांनी ई निविदा मध्ये भाग घेतला आहे, अशा सर्व व्यक्ती, संस्था, इ.चा ई निविदामधील तांत्रिक लिफाफा ऑनलाईन उघडण्यात येईल. ई लिलाव प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ई निविदेचा आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. अशाप्रकारे ई निविदा व ई लिलाव यामध्ये जी बोलीची रक्कम जास्त असेल त्या रक्कमेचा लिलाव अंतिम करण्यात येईल.

**प्रथम फेरी (ई-निविदा)**

| Sr.No. | Stage | Date and Time |
|---|---|---|
| 1. | Publishing date | 03.04.2018 10.00 AM |
| 2. | Document download | 03.04.2018 10.00 AM |
| 3. | Bid submission start date | 03.04.2018 10.00 AM |
| 4. | Bid submission end date | 10.04.2018 05.00 PM |
| 5. | Bid Opening date | 13.04.2018 12.00 PM |

**प्रथम फेरी (ई-लिलाव)**

| Sr.No. | Stage | Date and Time |
|---|---|---|
| 1. | Publishing date | 03.04.2018 10.00 AM |
| 2. | Document Submission/Payment Start Date | 03.04.2018 10.00 AM |
| 3. | Document Submission/Payment End Date | 10.04.2018 10.00 AM |
| 4. | Document/ Payment Approval Start Date | 11.04.2018 10.00 AM |
| 5. | Document/ Payment Approval End Date | 11.04.2018 05.00 PM |
| 6. | Auction Start Date | 12.04.2018 10.00 AM |
| 7. | Auction End Date | 12.04.2018 03.00 PM |

**दिव्तीय फेरी (ई-निविदा)**

| Sr.No. | Stage | Date and Time |
|---|---|---|
| 1. | Publishing date | 16.04.2018 10.00 AM |
| 2. | Document download | 16.04.2018 10.00 AM |
| 3. | Bid submission start date | 16.04.2018 10.00 AM |
| 4. | Bid submission end date | 23.04.2018 05.00 PM |
| 5. | Bid Opening date | 26.04.2018 12.00 PM |

**दिव्तीय फेरी (ई-लिलाव)**

| Sr.No. | Stage | Date and Time |
|---|---|---|
| 1. | Publishing date | 16.04.2018 10.00 AM |
| 2. | Document Submission/Payment Start Date | 16.04.2018 10.00 AM |
| 3. | Document Submission/Payment End Date | 23.04.2018 10.00 AM |
| 4. | Document/ Payment Approval Start Date | 24.04.2018 10.00 AM |
| 5. | Document/ Payment Approval End Date | 24.04.2018 05.00 PM |
| 6. | Auction Start Date | 25.04.2018 10.00 AM |
| 7. | Auction End Date | 25.04.2018 03.00 PM |

**तृतीय फेरी (ई-निविदा)**

| Sr.No. | Stage | Date and Time |
|---|---|---|
| 1. | Publishing date | 02.05.2018 10.00 AM |
| 2. | Document download | 02.05.2018 10.00 AM |
| 3. | Bid submission start date | 02.05.2018 10.00 AM |
| 4. | Bid submission end date | 09.05.2018 05.00 PM |

| 5. | Bid Opening date | 14.05.2018 12.00 PM |
|---|---|---|

तृतीय फेरी (ई-लिलाव)

| Sr.No. | Stage | Date and Time |
|---|---|---|
| 1. | Publishing date | 02.05.2018 10.00 AM |
| 2. | Document Submission/Payment Start Date | 02.05.2018 10.00 AM |
| 3. | Document Submission/Payment End Date | 09.05.2018 10.00 AM |
| 4. | Document/ Payment Approval Start Date | 10.05.2018 10.00 AM |
| 5. | Document/ Payment Approval End Date | 10.05.2018 05.00 PM |
| 6. | Auction Start Date | 11.05.2018 10.00 AM |
| 7. | Auction End Date | 11.05.2018 03.00 PM |

**(१) लिफाफा क्रमांक: (अ) तांत्रिक निविदेचा लिफाफा**

1.या लिफाफ्यात नापरतावा रक्कम रुपये ५०००/- On Line जमा केलेली पावती/चलनाची स्कॅन प्रत जोडावी.

2.रु.१,००,०००/-(अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष फक्त/-)चे ऐपतप्रमाणपत्राची स्कॅन प्रत.

3.आयकर विभागाचा PAN कार्डची स्कॅन प्रत

4.GST Registration certificate,पुराव्याची स्कॅन प्रत.

5.अनामत रक्कमेच्या डी.डी.ची स्कॅन प्रत/ online EMD Reciept.

6.रहिवाशी पुरावा म्हणुन मागील महिन्याचे विज/टेलिफोन बिलाची स्कॅन प्रत.

7.काळया यादीत नांव समाविष्ट नसल्याचे घोषणा पत्राची प्रत.

**(2) लिफाफा क्रमांक (ब):लिफाफ्यामध्ये ई-निविदा फॉर्ममध्ये विहीत केलेल्या प्रपत्रात दर भरण्याबाबत लिफाफा.**
२.ई-निविदा धारकांने वाळू लिलाव घाटाचे दर BOQ (Bill Of Quantity) फाईलमध्ये भरुन ती फाईल अपलोड करावी.

(**टिप:-वरील लिफाफा क्रमांक १ मधील सर्व कागदपत्र ई-टेंडर उघडण्याचे तारखेस सकाळी ११.०० वाजता सादर करणे बंधनकारक राहील लिफाफा क्रमांक १ मधील सर्व अटीची पुर्तता झाल्यास लिफाफा क्रमांक २ उघडण्यात येईल**.)

**<u>आवश्यक कागदपत्रे</u>** :ईनिविदा कम ई -लिलाव प्क्रियेत भाग घेणाऱ्या निविदाधारकांनी ऑनलाईन नोंदणी ( Registration) करणे अनिवार्य राहिल. ऑनलाईन नोंदणी साठी ( Registration) पुढील माहिती व कागदपत्राच्या साक्षाकिंत प्रती इच्छुक निविदा धारकास Online सादर करणे बंधनकारक आहे.1) ई-मेल आयडी 2) पॅन कार्ड 3)आधार कार्ड ४) रहिवास प्रमाणपत्र 5) GST Registration Certificate 6) मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र {2014-15,2015-16, 2016-17} 7)निवेदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत 100 रुपायाचे स्टॅम पेपरवर हमी पत्र 8) अधीकृत संस्थेकडील डिजीटल सिग्नेचर (डिजीटल की)

1.वाळू/रेती लिलाव हे ई निविदा व ई लिलाव पध्दतीने घेण्यात येणार आहेत,त्याकरीता सदर प्रक्रियेत भाग घेवू इच्छिणा-याकडे डिजीटल सिग्नीचर असणे आवश्यक आहे,तसेच ई निविदा www.mahatenders.gov.in व ई लिलावा करिता https://eauction.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

2.ई निविदा, ई लिलावात भाग घेण्यासाठी आवश्यक पात्रता.

अ.नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा,पॅन क्रमांक व जीएसटी क्रमांक असणे आवश्यक राहील.

ब. ई निविदा,ई लिलावात भाग घेणा-या व्यक्ती,संस्था,इ. यांनी ज्या वाळू गटाची हातची किंमत रू.10.00 लाख पेक्षा कमी असल्यास रू.2000/- व रू.10.00 लाखापेक्षा जास्त असल्यास रू.5000/-जिल्हाधिकारी बीड यांचे नावे राष्ट्रीयकृत बँकेच्या धनादेशा व्दारे भरणा करावे.

3.ई निविदा,ई लिलाव स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे,रद्द करण्याचे तसेच ई निविदा,ई लिलावाचे जाहीर प्रगटनामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी बीड व अपर जिल्हाधिकारी बीड यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत. त्याबाबत कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.